# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/महाडीबीटी-२०१९-२०/२०१९/2446 दिनांक : २०.०६.२०१९

**महत्वाचे परिपत्रक :**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
पुणे विभागातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या
अखत्यारीतील सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /
खाजगी विना अनुदानित संस्था..

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील महाराष्ट्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवर संस्थाचे प्रोफाईल अद्ययावत/नविन संस्थांचे रजिस्ट्रेशन करणेबाबत..**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत संस्थांचे शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील मंजूर झालेले शिक्षण शुल्क तसेच इतर शुल्क अद्ययावयत करण्याकरीता दिनांक १९.०६.२०१९ पासून सुरुवात झालेली आहे. तरी सदर संस्थांनी त्यांना मागील वर्षी प्राप्त झालेल्या लॉगीन युजर आयडी व पासवर्डचा वापर करून मंजूर शिक्षण शुल्क व विकास शुल्क योग्य त्या कागदपत्रांसह अद्ययावत करून शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडे ऑनलाईन मान्यतेकरीता पाठवायचे आहे. तसेच संस्था संलग्न असलेल्या विद्यापीठ/मंडळ यांचे मान्य परीक्षा शुल्क या विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पद्धतीने मान्यतेकरीता पाठवायचे आहे.

तसेच ज्या संस्था शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नव्याने सुरु झालेल्या आहेत व ज्यांनी अद्याप महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी केलेली नाही अशा संस्थांनी त्यांना युजर आयडी व पासवर्ड मिळणेसाठी या विभागीय कार्यालयाकडे संपर्क साधावा. त्यासाठी त्यांनी या विभागीय कार्यालयाकडे महाराष्ट्र शासनाचा मान्यतेचा शासन निर्णय, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांनी संस्थेस दिलेला डी.टी.ई. कोडचे पत्र सादर करावे.

संबधीत संस्थांना सूचित करण्यात येते की, शुल्क अद्ययावत करण्याची ऑनलाईन प्रक्रीया तसेच नविन रजिस्ट्रेशनची प्रक्रीया प्राधान्याने करावी.

Gaikwad 20.6.19
f सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

D:\Yogesh Kelkar\MAHADBT_2019-20\Circular for registration on MahaDBT.docx